# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २३४-२२** **दिनांक ०१/०८/२०२२**

## पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याकरिता आलेल्या टोळीला जेरबंद करण्यात वालीव पोलीस ठाणेस यश.

दिनांक २९/०७/२०२२ रोजी वालीव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री राहुलकुमार पाटील यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, 'एका सफेद रंगाच्या वेगनार कारमधुन काही इसम पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्यासाठी येणार आहेत'. मिळालेल्या बातमीची शहानिशा करुन सदरबाबत पुढिल कायदेशिर कारवाई करणेबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी आदेश दिल्याने लागलीच दोन पथके तयार करण्यात आली.

सदर बातमीच्या अनुषंगाने दोन्ही पथकांनी भिवंडी चिंचोटी वाहिनीवरिल डावे बाजुस सापळा लावला असता संशईत पांढ-या रंगाची वेगनार कार क्रमांक एम. एच. ०१/सि.जे/६२५२ हि दिसून आल्याने गुप्त बातमीदाराने सदर कारमधील इसम हेच जय अंबे पेट्रोल पंपावर दरोडा घालणार असल्याचे सांगीतल्याने दोन्ही पथकांनी लागलीच सदर कार थांबवुन कार मधील ०६ इसमांना गाडीच्या खाली उतरण्याचा इशारा केला असता त्यातील २ इसम हे पळुन जाण्यास यशस्वी झाले. नमुद वाहनातील ४ इसमांना ताब्यात घेवुन त्यांची नावे विचारली असता १) संजयकुमार रामेश्वर सिंग, वय २४ वर्षे, २) सुमितकुमार राजेंद्र सिंग, वय -२३ वर्षे, ३) विनोदकुमार बिदेश्वर सिंग, वय २४ वर्षे, ४) राजेश श्याम मुखीया, वय २६ वर्षे, सर्व रा. रघुकुल बिल्डींग, रुम नं २१९, साई छाया बिल्डीग समोर, साई बाबा मंदीर रोड, शिवाजी नगर, कोनगाव, सरवली, कल्याण (प.), ता. कल्याण, जि. ठाणे असे असल्याचे सांगीतले. नमुद चारही इसमांना सदर ठिकाणी येण्याचे प्रयोजन विचारले असता ते काहीएक उपयुक्त माहीती देत नसल्याने चारही आरोपीत यांना वेगवेगळे करुन विश्वासात घेवुन चौकशी केली असता ताब्यात घेतलेले इसमांपैकी सुमितकुमार राजेंद्र सिंग याने सांगितले की, "हम छह साथी राजेश श्याम मुखीया के कहने पर मुंबई-अहमदाबाद हायवेपर स्थित जय-अंबे पेट्रोल पंप लुटने आये थे " असे सांगितले. सदर आरोपीत यांचे ताब्यातुन २,६५,५००/- रुपये किंमतीची एक चारचाकी गाडी, ४ मोबाईल, १ तलवार, १ ग्राईंडर, १ पकड, १ स्क्रु ड्रायवर असे जप्त करण्यात आलेले आहे. सदर आरोपीत यांना दिनांक – २९/०७/२०२२ रोजी अटक करण्यात आलेली असुन दिनांक

०३/०८/२०२२ पावेतो त्यांना पोलीस कस्टडी रिमांड देण्यात आली आहे व सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/ज्ञानेश फडतरे हे करीत आहेत.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -२ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाण्याचे् वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, श्री. राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, सपोनि/जयचंद ठाकुर, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, उमेश चौधरी, तारमाळे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, पोना /सतिश गांगुर्डे, जाधव, पो.अंम. गजानन गरीबे, सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.